# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@mahapolice.gov.in
☎ : 07172-264300, 📠: 07172-255800 ✍: 7447744100


## पोलीस वार्तापत्र

# आंतरराज्य गांजा तस्करी टोळीचा पर्दाफाश

## एकुण ११ किलो अमली पदार्थ (गांजा) सह रु.२,२२,०००/- रु. चा माल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर ची कामगिरी

चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई केली असून, ओडिशातून गांजा आणून विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला जेरबंद केले आहे. या कारवाईत ३ महिला आणि २ पुरुष आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून ११ किलो गांजा, ऑटो आणि मोबाईलसह एकूण २,२२,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराकडून माहिती  मिळाली की, काही महिला ओडिशा राज्यातून गांजा घेऊन येत आहेत आणि बल्लारपूर येथील पुरुष सहकाऱ्यांसह ऑटोने राजुरा येथे विक्रीसाठी जात आहेत. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने बल्लारपूर-राजुरा सास्ती मार्गावर सापळा रचुन  संशयास्पद ऑटो क्रमांक MH-34 BH-1626 थांबवून झडती घेतली असता, त्यामध्ये बसलेल्या महिलांच्या पिशव्यांमध्ये ११ किलो अवैध गांजा आढळून आला. . सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बल्लारपुर येथे एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवुन गुन्हयात (१) गांजा ११ किलो (अवैध अमली पदार्थ सदृष्य वनस्पती), (२) वाहन एक ऑटो (क्रमांक MH-34 BH-1626),  ४ मोबाईल संच असा एकूण किंमत २,२२,०००/- रुपये चा माल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयात (१) मोहम्मद युनुस अली उर्फ बादशाह (३८ वर्षे) ऑटो चालक, बल्लारपूर, (२) लालचंद गणेश केसकर (६५ वर्षे) बल्लारपूर, (३) श्रीमती उमा हामु नुनावत (५० वर्षे) रा. मुळगु, जि. वरंगल (तेलंगणा), (४) सौ. ललिता आकाश दामले (२४ वर्षे) रा. ईटारसी (मध्यप्रदेश), (५) कु.आरती गुलाब परते (२८ वर्षे) रा. भोपाळ (मध्यप्रदेश) तसेच या गुन्ह्यात ओडिशातील मुनीगडा येथील मुख्य पुरवठादार इंद्रजित पाराससेठ आणि रामबाबू (दोन्ही पाहिजे असलेले आरोपी) यांची नावे निष्पन्न झाली आहेत. प्रकरणाचा पुढील तपास बल्लारशा पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक श्री ईश्वर कातकडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अमोल काचोरे, स्थानिक गुन्हे शाखा चंदपूर यांचे नेतृत्वात सपोनि श्री दिपक कॉक्रेडवार, सपोनि श्री बलराम झाडोकार, पोउपनि श्री संतोष निंभोरकर, पोउपनि श्री सर्वेश बेलसरे, सफौ स्वामी चालेकर, पोहवा किशोर वैरागडे, अजय बागेसर, पोअं.गोपीनाथ नरोटे, शेखर माथनकर, मपोअं/छाया निकोडे, अपर्णा मानकर, चापोअं गजानन मडावी स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर आणि सायबर पोलीस स्टेषन चंद्रपूर च्या पथकाने केली आहे.